**शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.साठी मान्यता देणेबाबत .**

SOLAPUR EDUCATION SOCIETY'S POLYTECHNIC, SOLAPUR)

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

**शासन निर्णय क्र.1722703 -HTED-14025/30/2026-MHT(TE-5)**

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.

दिनांक:- २४ जून २०२६.

**संदर्भ :**-संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक १०/ एनजीपी/ २०२६/एआयसीटीई मान्यता/६४०९/३/२९२ , दिनांक ०२.०६.२०२६.

**प्रस्तावना :-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून विद्यमान संस्थेमध्ये नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.साठी शासन मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी संदर्भाधिन पत्राद्वारे शासनास सादर केलेला आहे.

**शासन निर्णय :-**

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून SOLAPUR EDUCATION SOCIETY'S POLYTECHNIC, SOLAPUR या विद्यमान विनाअनुदानित संस्थेमध्ये नवीन अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरू करणे, सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ इ.याबाबत सोबत जोडलेल्या तक्त्यात नमुद केल्यानुसार संस्थेला त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आल्यानुसार खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून शासन मान्यता देण्यात येत आहे.

१. सदर मंजूरी कायम विना अनुदान तत्वावर राहील.

